क्रमांक/विशा/आस्था/कार्या-११(३)/कावि/११९९/२०२२
विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर
दिनांक:- ०६/०६/२०२२

**ज्ञापन,**

नागपूर विभागातील जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त सेवा जेष्ठता याद्यांनुसार **जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (समाजकल्याण) सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी** या संवर्गामध्ये दिनांक ०१.०१.२०२१ रोजी कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा जेष्ठता सुचीच्या आधारे विभागीय स्तरावरील तात्पुरती सेवाजेष्ठता सुची तयार करण्यात येवून ह्या ज्ञापनाव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर जेष्ठता सुची त्यांचे अधिनस्त सर्व संबंधीतांच्या निदर्शनास येईल या दृष्टीने आवश्यक कार्यवाही विनाविलंब करावी व जेष्ठता यादी निदर्शनास आणल्याबाबतची दिनांकित पोच या कार्यालयास सादर करावी. जेष्ठता यादीवर कर्मचाऱ्यांचे काही आक्षेप असल्यास ते संबंधीतांनी यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसाचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे सादर करावेत.आक्षेप प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे आक्षेप संबंधीतांनी सादर केलेले कागदपत्रे व कार्यालयीन अभिलेखे पडताळून पाहून आवश्यक कागदपत्र जोडून आक्षेप मान्य/अमान्य याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह ०३ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावे. सेवा जेष्ठता यादी जिल्हा परिषदेचे संकेत स्थळावर न चुकता प्रसिद्ध करावी.

विहित मुदतीत व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अभिप्रायासह आक्षेप प्राप्त न झाल्यास प्राप्त आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही, याची जाणिव सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना करुन द्यावी. थेट पाठविले जाणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

**(डॉ.माधवी खोडे-चवरे)**
**विभागीय आयुक्त**
**नागपूर विभाग,नागपूर**

प्रतिलिपी

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ------------------- (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता अग्रेषित. त्यांनी सदर जेष्ठता यादी संबंधीत सर्व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे निदर्शनास येईल यादृष्टीने आवश्यक कार्यवाही विनाविलंब करावी. तसेच तालुकास्तरावर सदर यादया तात्काळ प्रसिध्द करण्याची जबाबदारी आपली आहे. यास्तव आवश्यकतेनुसार जेष्ठता यादीच्या प्रती आपले स्तरावर प्रसिध्द कराव्यात. याबाबत कोणत्याही कर्मचाऱ्यांची यादी निदर्शनास/ प्रसिध्द न झाल्याबाबत तक्रार येणार नाही याची योग्य ती दक्षता घ्यावी. सदर यादीवर कर्मचाऱ्यांकडून काही आक्षेप/सुचना प्राप्त झाल्यास या कार्यालयाकडे मान्य/अमान्य याबाबतचे आपले अभिप्रायासह वरीलप्रमाणे मुदतीचे आत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व तद्नंतर सदर जेष्ठता सुचीचे अनुषंगाने काही तक्रारी/निवेदने प्राप्त झाल्यास याची सर्व जबाबदारी आपले कार्यालयातील संबंधीत आस्थापना अधिकारी/कर्मचारी यांची राहिल याची यथार्थ जाणिव त्यांना करुन द्यावी.

२. **उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बा.क.) जिल्हा परिषद -------------------- (सर्व)** यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता अग्रेषित. त्यांनी सदर जेष्ठता यादी संबंधीत सर्व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे निदर्शनास येईल यादृष्टीने आवश्यक कार्यवाही विनाविलंब करावी. आवश्यकतेनुसार जेष्ठता यादीच्या प्रती आपले स्तरावर संबधित कार्यालय तात्काळ पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत कोणत्याही कर्मचाऱ्यांची यादी प्रसिध्द न झाल्याबाबत तक्रार येणार नाही यांची योग्य ती दक्षता घ्यावी.

परिशिष्ट तीन

दरवर्षी जेष्ठता यादी प्रसिद्ध करण्याचा विहित नमुना (नियम-५)

**संवर्गाचे नाव:- जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (समाजकल्याण ) सहा.बाल विकास प्रकल्प अधिकारी**

**वेतनश्रेणी:-एस-१३ ३५४००-११२४००/-**

**दिनांक ०१.०१.२०२१ रोजीची अंतरिम जेष्ठता सुची (दिनांक ०१/०१/२०२० ते ३१/१२/२०२० या कालावधीत कार्यरत कर्मचा-यांची)**

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्यांचे नांव | जि.प.चे नांव | जन्म तारीख | जात | मागासवर्गीय आहे काय? संवर्ग | शैक्षणिक पात्रता | प्रथम नियुक्तीची तारीख | सध्याचे संवर्गात नियुक्तीचा दिनांक | सध्याचे पदावरील नियुक्तीचा मार्ग | वर्ग-२ मध्ये पदोन्नती झाली काय? | सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण/सुट | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | १ | श्रीमती आशा कारदार | चंद्रपूर | १.७.१९६४ | मुस्लीम | खुला | एमए एमफील | ८.२.१९९३ | ८.२.१९९३ | सरळसेवा | नाही | उत्तीर्ण २००० | ३०.०६.२०२२ | लाचलुचप प्रकरणात चौकशी व न्यायालयी प्रकरण सु |
| २ | २ | कु. ए. जी. नागुलवार | भंडारा | १८.१२.१९६४ | पद्मशाली | विमाप्र | एमएसडब्लु | २९.८.१९९६ | २७.६.२००१ | पदोन्नती | नाही | उत्तीर्ण २०.१०.२००१ | ३१.१२.२०२२ | |
| ३ | ३ | श्रीमती विभावरी तितरे | चंद्रपूर | २१.१२.१९७२ | महार | अजा | बीएससी (कृषी) एमएसडब्लु | १८.६.१९९९ | २१.६.१९९९ | सरळसेवा | नाही | उत्तीर्ण ३०.०९.०३ | ३१.१२.२०३० | |

(मंजुषा ठवकर)
उपआयुक्त (आस्थापना)
आयुक्त कार्यालय नागपूर

(डॉ.माधवी खोडे-चवरे)
विभागीय आयुक्त
नागपूर विभाग नागपूर